# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
# Maharashtra Water Resources Regulatory Authority


क्र. मजनिप्रा/२०१७/प्र.मा./विपाविम/९६/२३० दिनांक : १४/०३/२०१९

प्रति,

मुख्य अभियंता (जसं),

जलसंपदा विभाग, सिंचन भवन,

शिवाजीनगर कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२.

विषय : महादापूर ल. पा. योजना ता. झरीझामणी, जि. यवतमाळ प्रकल्पाकरीता मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ : प्राधिकरणाचे समक्रमांकित पत्र क्र. १६६ दि. २१/०२/२०१९

विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्रान्वये दि. ६ मार्च २०१९ रोजी दु. ३:३० वाजता मुख्य अभियंता (जसं) अमरावती यांचे सादरीकरण आयोजित केले होते. सदर सादरीकरण बैठकीचे इतिवृत्त पुढिल कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

सोबत - वरीलप्रमाणे

(रसिक चौहान)

सचिव, मजनिप्रा

प्रत माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी

१) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१

२) अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, वाघापूर रोड, यवतमाळ - ४४५ ००१.

<u>सादरीकरण बैठकीचे इतिवृत्त</u>

विषय - महादापूर ल. पा. योजना ता. झरीझामणी, जि. यवतमाळ
प्रकल्पाकरीता मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत

दिनांक - ०६/०३/२०१९ वेळ - दु. ३:३० वाजता.

कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी दि. २८/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये महादापूर ल. पा. योजना ता. झरीझामणी, जि. यवतमाळ प्रकल्पासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची (मजनिप्रा) मान्यता मिळणेबाबत सादर केला होता. प्राधिकरणाने दि. ३१/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सप्टेंबर २०१७ मध्ये तयार केलेल्या Policy नुसार प्रस्ताव पुनःसादर करण्याविषयी कळविले होते. अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे प्रकल्प मंडळ, यवतमाळ यांनी दि. १५/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये एक इंग्रजी टिप्पणी सादर केली होती. सदर टिप्पणीच्या अनुषंगाने प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार मुख्य अभियंता (जसं) अमरावती यांचे दि. ०६/०३/२०१९ रोजी विषयांकित प्रकरणी एक सादरीकरण आयोजित करण्यात आले.

सदर सादरीकरणास उपस्थित असलेल्यांची यादी खालीलप्रमाणे आहे;

| मजनिप्रा | जलसंपदा विभाग |
|---|---|
| १) श्री. क.प्र. बक्षी, अध्यक्ष<br>२) श्री. वि.मा. कुलकर्णी, सदस्य (अभियांत्रिकी)<br>३) डॉ. शि.त्रिं. सांगळे, सदस्य (अर्थव्यवस्था)<br>४) श्री. रसिक चौहान, सचिव<br>५) श्री. रोहन सोडळ, उपसंचालक (नि) | १) श्री. र.प्र. लांडेकर, मुख्य अभियंता (जसं) अमरावती<br>२) श्री. ग.ल. राठोड, कार्यकारी अभियंता, य.प्र.बां. विभाग, यवतमाळ<br>३) श्री. कु.मो. मोरे, कनिष्ठ अभियंता, य.प्र.बां. विभाग, यवतमाळ |

सदर सादरीकरण दरम्यान विषयांकित प्रकरणी सखोल चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान सादर केलेल्या प्रस्तावामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने मु. अ. (जसं) अमरावती यांनी सादर केलेला प्रस्ताव परत घेण्याची विनंती केली. मा. अध्यक्ष यांनी त्यास अनुमती दिली.

सदर बैठक मा. अध्यक्ष यांचे आभार मानून संपन्न झाली.